# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 04/05/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

### फसवणुक

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत ०३ किमी अंतरावरील मौजा केसलापुर टि पॉईट मौदा येथे दिनांक ०३/०३/२०२२ चे ११.०० वा. ते दिनांक २९/१०/२०२२ चे १२.०० वा. दरम्यान **आरोपी नामे— स्वप्नील संजय क्षिरसागर, रा. माथनी** याने एन. टी. पी. सी. मौदा येथे असीस्टंट ऑपरेटर म्हणुन लावुन देतो त्याकरीता फिर्यादी व त्याचे मित्र नामे— संजय मारबते यांना १,५०,०००/—रु. दयावे लागेल असे म्हणुन फिर्यादी याने दि. ०३/०३/२०२२ रोजी दुपारी ११/०० वा. दरम्यान आरोपीने म्हटल्याप्रमाणे नगदी ४०,०००/—रु. एनटीपीसी गेट जवळ दिले नंतर १७/०५/२०२२ रोजी सायं. ०५/०० वा. दरम्यान नगदी ५०,०००/—रु. दिले व उर्वरीत रक्कम माहे जुलै २०२२ ला ६०,०००/—रु माथनीला दिले तसेच फिर्यादीचे मित्रांनी सुद्धा दिनांक २९/१०/२०२२ रोजी आरोपीने दिलेल्या अकाउंट नंबरवर मौदा येथील प्रविन एजेंसी येथुन ऑनलाईन ७,०००/—रु. केले आरोपीने १, २ महिन्यामध्ये तुमची गेट पास बनुन जाईल असे सांगितले. फिर्यादीस गेटपास न मिळाल्याने फिर्यादीने आरोपीचे मोबाईलवर फोन करून विचारपुस केली असता आरोपी टाळाटाळ करू लागला त्यामुळे फिर्यादीने आपले पैसे परत मागितले असता आज पर्यंत टाळाटाळ करत आहे फिर्यादी व त्याचे मित्र यांना नोकरीचे आमिश देवुन विश्वासघात करून फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४०६ भादवी. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ. देशमुख ब. नं. ४५ मो. क्र. ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

### अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ०२ किमी अंतरावर यशवंत नगर कन्हान येथे दिनांक ०२/०५/२०२३ चे २३/१५ वा. ते २३/३० वाजता दरम्यान यातील एक इसम रेल्वे पटरीजवळ हातात चाकु घेवुन यशवंत नगर कन्हान येथे फिरत आहे अशा मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन फिर्यादी व स्टाफ हे नमुद घटनास्थळी जावुन पाहणी केली असता एक इसम हातात चाकुसारखे शस्त्र घेवुन फिरताना दिसला पोलीस स्टाफच्या मदतीने त्याला पकडुन त्यास ताब्यात घेतले व पंचासमक्ष त्याचे नाव गाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव —**अजित करण लोडे, वय २९ वर्ष, रा. यशवंत नगर कन्हान** असे सांगितले पंचासमक्ष अंगझडती घेतली त्याच्या उजव्या हातात एक स्टील पात्याचा धारदार चाकु मिळुन आला चाकुची एकुण लांबी १३ इंच ३ सेमी पात्याची लांबी ८ इंच २ सेमी व प्लास्टीक मुठेची लांबी ५ इंच ३ सेमी पात्याची रुंदी १ इंच ३ सेमी व एका बाजुने १० खाचे असे किंमती अंदाजे २००/— रूपयाचा चाकु मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— सफौ. सुर्यभान हरिभाऊ जळते बं. नं १३५ पो स्टे कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोका. कायदाअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ सुर्यभान हरिभाऊ जळते ब. नं. १३५ पो स्टे कन्हान हे करीत आहेत.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर